MHLA160000772009

<u>नियमित दिवाणी दावा क्र.५९/२००९</u>
<u>शकुंतलाबाई वि. वेंकट व ईतर</u>

–:: <u>नि.क्र.७८ लगत आदेश</u> ::–

मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. सन्माननीय उच्च न्यायालय यांनी प्रकरण पाच महिन्याच्या आत निकाली काढण्याबाबत आदेशित केलेले आहे. त्याप्रमाणे जवळपास एक महिना दहा दिवसाचा कालावधी संपलेला आहे. वादीला सदर आदेशाची माहिती असताना सुध्दा ती हजर झाली नाही. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने मी वादीला कोर्टा मोशनद्वारे नोटीस काढली होती. ती वादीवर बजावलेली आहे. वादीचे अधिवक्ता श्री. व्ही.एन. संकाये हे हजर झाले. परंतु त्यांनी वकीलपत्र दाखल करण्यास सदर पुरसीस द्वारे वेळ मागितला. येथे नमूद करणे आवश्यक आहे की, पुरसीसच्या आधारे वेळ देता येत नाही, कारण तो अर्ज नाही. त्याचप्रमाणे अभिलेखामध्ये सदर विधीज्ञाचे वकीलपत्र निशाणी ४९ दाखल आहे. त्यामुळे सदर पुरसीसमध्ये तथ्य नाही. त्यामुळे ती नामंजूर करण्यात येते.

०२. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.11.24 17:42:35 +0530

**( श.अ. सुरजुसे )**
**दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**देवणी.**

**ठिकाण – देवणी**
**दिनांक – २४–११–२०२५**